RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १० (४)] मंगळवार, एप्रिल ७, २०२६/चैत्र १७, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक १८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	**पृष्ठे** १-२

दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९५८ चा ६०.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेः—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५३अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३अ मधील, पोट-कलम (१) ला पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९५८ चा ६०.

"परंतु, जेव्हा कार्यवाही सुरू करण्याची नोटीस, वर नमूद केलेल्या सहा वर्षांच्या कालावधीत काढण्यात आली असेल त्या बाबतीत, उक्त कालावधी समाप्त झाल्याच्या कारणास्तव अशी कार्यवाही व्यपगत होणार नाही आणि अशा कार्यवाहीत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून अंतिम आदेश पारित करण्यात येईपर्यंत ती सुरू राहील.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.